जाहिरात

प्रशासकीय अधिकारी ( गट ब ) (करार तत्वावर) नियूक्ती करण्यावाबत....
संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई

संचालनालय व त्याच्या अधिनस्त असलेल्या संस्थामध्ये कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी त्यांच्या सेवाविषयक व इतर तत्सम कारणास्तव मा.सर्वाच्च् न्यायालय, मा.उच्च न्यायालय, मा. प्रशासकीय न्यायाधिकरण व इतर कनिष्ठ न्यायालय. याचीका / दावे दाखल करतात. त्या अनुषंगाने मा.न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यासाठी परिच्छेद निहाय अभिप्राय तयार करण्याचे काम करावयाचे आहे. परिच्छेद निहाय अभिप्राय व त्या अनुषंगीक कामासाठी प्रशासकीय अधिकारी गट ब ( करार तत्वावर) यांची खालील अटी व शर्तीच्या आधारे नियुक्ती करण्यासाठी याव्दारे जाहीरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

पदांची संख्या : - प्रशासकीय अधिकारी - १ पद (गट ब ) ( करार तत्वावर ))

१. अर्हता व अनुभव १) विवक्षीत कामासाठी लागणारी अर्हता अथवा संबधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा.
२) करार पध्दतीने करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा तसेच सदर पदाचे काम करण्याची क्षमता असावी.
३) करार पध्दतीने नियूक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी याच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावीत नसावी किंवा कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
४) प्राप्त होणा-या अर्जदाराकडे १५० हून अधिक न्यायालयीन प्रकरणी परिच्छेदनिहाय अभिप्राय तयार करण्याचा अनूभव असावा.
५) न्यायालयीन कामकाज विचारात घेता इंग्रजीतून पत्रव्यवहार करण्याची क्षमता असावी.

अटी व शर्ती :- १ सदर नियूक्ती सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं.संकीर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर,२०१६ मधील अटी व शर्तीनूसार करण्यात येईल.
२) अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.
३) अर्दाराने सदर पदाकरीता अर्ज सोबत जोडलेल्या नमून्यात को-या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहून अथवा टंकलेखन करुन सादर करावा.
४) अर्जदाराने सदर पदाकरीता अर्ज दिनांक ८ जून २०२० पर्यंत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, चौथा मजला, सेंट जॉर्जस रुग्णालय आवार,पी.डिमेलो रोड,मुंबई या पत्यावर पोहचेल अशा रितीने टपालाने पाठवावा.अधिक माहीतीसाठी ०२२-२२६२०३६१ -६५ ( विस्तारीत ३३०-३३१) या दुरध्वनीवर संपर्क साधावा.विहीत मुदतीत प्राप्त न झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भात कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.
६) नियूक्त प्रशासकीय अधिकारी गट ब (करार तत्वावर )यांना संचालनालयाच्या न्यायालयीन कक्षामध्ये काम करावे लागेल.
७) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी गट ब ( करार तत्वावर )यांना संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांच्या नियंत्रणाखाली काम करावे लागेल तसेच त्यांना वेळोवेळी केलेल्या कामकाजाचा अहवाल सादर करावा लागेल.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई.